# मुले व युद्धे

**सामाजिक**

(संयुक्त राष्ट्रसंघाच्या सेक्रेटरी जनरलचे, मुले आणि युद्धे यांबाबतचे खास प्रतिनिधी तसेच राष्ट्रसंघाचे उपसचिव ओलारा ओटुनू यांची एक मुलाखत, 'सोका गोक्काई इंटरनॅशनल' च्या क्वार्टरली जर्नलने अलीकडेच ऑक्टोबर २००२ मध्ये घेतली. युद्धामुळे होणारे बालकांचे हाल सर्वांगांनी कमी व्हावेत या हेतूने ओलारा ओटुनू यांची नेमणूक झालेली आहे. त्यांच्या कामाचे स्वरूप आणि त्यांची स्वतःची अनुभवान्ती निर्माण झालेली मते, यांचा वेध या मुलाखतीतून घेण्यात आला आहे.)

जगाचा सर्व व्यवहार हा प्रौढांनी प्रौढांसाठी चालविलेला व्यवहार आहे. मुलांना येथे स्थान नाही. मुलांच्या गरजा हा सामाजिक पातळीवर दुर्लक्षित असलेला भाग आहे. उलट मुलांना अकालीच प्रौढ करणारा असा प्रौढांचा व्यवहार आहे. मानवी असंस्कृततेचा कळस अशा असणाऱ्या युद्धांचा, यांत फार मोठा सहभाग आहे.

गेल्या दशकात युद्धांमध्ये वीस लाख मुलांची कत्तल झाली; साठ लाख मुले गंभीररीत्या जखमी झाली आणि त्यातील कित्येक कायमची अपंग झाली. सुमारे दहा लाख मुले अनाथ झाली आणि सुमारे एक कोटी मुलांवर युद्धव्यवहार डोळ्यांसमोर घडल्यामुळे, विलक्षण मानसिक आघात झाले. बालविकासाचे शास्त्र असे सांगते की अजाणत्या वयातील मुलांसमोर अगदी आई-वडिलांनीसुद्धा भांडू नये, इथे तर राष्ट्र परस्परांशी भांडून मुलांसमोर रक्तलांछित युद्धे घडवून आणतात. बालकांचे बालपण उद्ध्वस्त करतातच पण, जगाला अशा मानसिक व शारीरिकदृष्टया अपंग झालेल्या, विकृत झालेल्या प्रौढांची देणगीही देतात.

युद्धांनी ज्यांचे आयुष्य बालपणी उद्ध्वस्त केले आहे अशी दोन कोटी मुले आज हयात आहेत, अठरा वर्षांच्या आतील सुमारे तीन लाख मुले आज युद्धभूमीवर सैनिक म्हणून हातात शस्त्र घेऊन उभी आहेत. दरसाल सुमारे दहा हजार मुले, आजही, खोलवरच्या खाणीत काम करून पंगू तरी होताहेत किंवा चक्क मृत्युमुखी पडताहेत. अनेक मुलींना युद्धांमुळे बलात्काराला किंवा लैंगिक अत्याचारांना बळी पडावे लागत आहे. युद्धात भाग घेणारे सैनिक शस्त्रसज्ज आणि चिलखतसंरक्षित असतात. परंतु आजही बहुतेक युद्धे ही शस्त्रविहीन अशा नागरिकांनाच लक्ष्य करून विध्वंस करीत असतात. आणि यात पोळून निघणाऱ्यांत प्रामुख्याने महिलांचा व लहान मुलांचा समावेश असतो.

उत्तर : युद्धांमुळे अनेक बालकांना जो परिणाम भोगावा लागतो त्याविषयी समाजात आणि सरकारांमध्ये जाणीव जागृती करणे, यावर माझ्या या कामाचा मुख्य भर असणार आहे. त्याचबरोबर, राष्ट्र संघाची सुरक्षा परिषद, युरोपियन कमिशन, जी-आठ राष्ट्रे या आणि अशा जागतिक पातळीवर निर्णय घेणाऱ्या संस्था-संघटना आहेत, त्यांना या विषयाच्या दिशेने कार्यरत करण्याचा प्रयत्न करणे आणि काही निश्चित मानके ठरवून देणे, संकेत ठरवणे, असाही या कामाचा भाग आहे. आणखीही दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे, आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त अशी जी बालहक्काची सनद आहे, तसेच आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेची, अत्यंत हीन अशा कामांतील बालमजुरांबाबतची सनद आहे, त्यांच्या अनुषंगाने काही प्रथा ठरविणे. दसरी म्हणजे, ज्या संस्था-संघटना,

जागतिक शांततेसाठी आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी काम करताहेत त्यांना, त्यांच्या कार्याला अधिक प्रोत्साहन देणे नि सहाय्य करणे, असेही काम माझ्या कार्यसूचीवर आहे.

प्रश्न : युद्धग्रस्त मुलांचे संरक्षण करण्याचा प्रश्न सध्या इतका महत्त्वाचा का ठरला आहे?

उत्तर : युद्धांमुळे सर्वात जास्त पोळली जातात ती स्त्रिया आणि मुले. त्यातही मुले स्वतःचे रक्षण करायला, आपले हित पाहायला समर्थ नसतात. त्यामुळे त्यांना शारीरिक-मानसिक आघात मोठ्या प्रमाणावर सोसावे लागतात. निर्वासितांच्या किंवा देशांतर्गत युद्धग्रस्तांच्या छावण्यांत डोकावले तर लगेच कळून येते की, तिथली मुले किती उद्ध्वस्त झाली आहेत, मुलांचा युद्धसैनिक म्हणून नि मुलींचा लैंगिक छळ किती होतोय!

नुसता असा परिणामच नाही तर इतरही कितीतरी गोष्टी घडतात. मुले अनाथ होतात, निराधार होतात, शिक्षणाच्या संधींपासून वंचित होतात, औषधोपचारापासून दुरावतात नि संसर्गजन्य रोगांना बळी पडतात. समाजातील अनेक दुष्कृत्यांमध्ये त्यांना वापरून घेतले जाते.

प्रश्न : युद्धांचा लहान मुलांवर काय परिणाम होतो हे लोकांना सांगणे हे तुमचे मुख्य काम आहेच. पण एकूणच युद्धांचा होणारा सर्वसामान्य सामाजिक परिणाम काय आहे ?

उत्तर : युद्धांचा बालकांवरील परिणाम मांडतानाच आम्ही, युद्धाच्या फार मोठ्या खर्चाचा, त्यातही मानवी परिव्ययाचा प्रश्नही पुढे आणू पाहतोय. हा केवळ नैतिक पातळीवरचा प्रश्न नाही, तर युद्धाची उद्दिष्टे आणि त्यांची समाजाला परवडणारी किंमत यांतील परस्परसंबंधाचाही आहे. सर्वच युद्धे लोकांच्या नावे लढली जातात, लोकांना अधिक चांगले जीवन देण्याचा दावा ती करतात. पण त्यात मोठी विसंगती आहे; ती अशी की, अखेरीस समाजच त्यासाठी फार मोठी किंमत मोजत असतो. ज्यांच्यासाठी युद्ध करायचे तो समाज- त्यातील बालके यातून नष्ट होत असतात. त्यामुळे आपण आता, जे युद्ध घडवून आणतात त्यांना, त्यांच्या कृत्याचा जाब मागितला पाहिजे. उद्दिष्ट काय आहे, ते कितपत योग्य आहे, युद्धाची किंमत काय, या गोष्टी पुढे आणल्या पाहिजेत. कोलंबिया किंवा सुदानमध्ये किंवा आणखी कुठे, वीस-तीस वर्षांनी, उद्दिष्टपूर्तीसाठी रस्त्यात नाचायला तरी कोण शिल्लक असणार आहे ? मुलांच्या भवितव्यावर या प्रश्नामुळे प्रकाश पडणार आहे.

प्रश्न : या तुमच्या प्रयत्नांची प्रगती कोणकोणत्या बाबतीत आणि कितपत झाली आहे ? उत्तर : एक म्हणजे आता लोकांना या प्रश्नाची बऱ्यापैकी समज येऊ लागली आहे. धोरणकर्त्या महत्त्वाच्या संस्थांच्या कार्यसूचीवर 'युद्धे व बालके' हा विषय येऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांततेच्या प्रयत्नांमध्ये त्यांच्याही कार्यसूचीवर या विषयाचा अंतर्भाव झाला आहे. आता, शांतता प्रस्थापित करण्याच्या वेगवेगळया कामांच्या जागी 'बालक

संरक्षण सल्लागार' नेमले गेले आहेत. 'नॉर्दन आयर्लंड पीस ॲग्रीमेंट,' 'द लोम ॲग्रीमेंट ऑन सिएरा लिओन,' 'द अरूशा ॲग्रीमेंट फॉर बुरुंडी' अशांमध्ये या विषयाला स्थान दिले गेले आहे.

काही मानके ठरविण्याच्या बाबतीत तर चांगलीच प्रगती झाली आहे. उदाहरणार्थ, बालहक्काच्या सनदेत, 'मुलांचा युद्धात सैनिक म्हणून वापर होऊ नये,' हे कलम स्वीकारले गेले आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय निर्माण करणाऱ्या रोम कायद्यात तर बालकांच्या संरक्षणाबाबत अतिशय ठळकपणे तरतूद करण्यात आली आहे. शिवाय अनेक ठिकाणी वैयक्तिकरीत्यासुद्धा माझ्याकडे लोकांनी अशी बांधिलकी स्वीकारली आहे की,' युद्धात ते नागरी भागावर हल्ला करणार नाहीत, लोकांना वस्तूपुरवठा केला जात असताना त्यात अडथळे आणणार नाही. शाळांवर किंवा रूग्णालयांवर हल्ला केला जाणार नाही किंवा मुलांना सैनिक म्हणून घेतले जाणार नाही,इत्यादी.' पण, या सगळयांपेक्षाही मुलांचेच कौतुक वाटते. लहान मुले आणि युवक जेव्हा युद्धानंतरच्या पुनर्वसनाच्या कामात प्रत्यक्ष उतरतात तेव्हा शांततेच्या शक्यतांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर फुलून येतो. त्यांच्यापैकी कित्येक जण आता या शांतता चळवळीत प्रचाराचे काम करताहेत.

प्रश्नः याची काही उदाहरणे देता येतील का?

उत्तर : युद्धाग्रस्त देशांतील मुले आणि जपानसारख्या इतर देशांतील मुले यांचे परस्परसंबंध बांधण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. 'मुले नि संघर्ष' अशा विषयाला धरून काही कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या आहेत, त्यांचे वितरण 'ग्लोबल पीस स्कूल्स'तर्फे केले जाते. 'व्हाफईस ऑफ चिल्ड्रेन ' हे रेडिओ प्रॉजेक्टही आम्ही सुरू केले आहे. युद्धे झालेल्या प्रदेशांना मी दिलेल्या भेटींमध्ये मला आढळले आहे की अशा ठिकठिकाणच्या मुलांच्या प्रमुख गरजा आहेत त्या माहिती मिळण्याच्या, त्याचबरोबर करमणूक, संगीत अशांच्या. त्यामुळे स्थानिक रेडिओवर केवळ मुलांच्या अशा त-हेच्या गरजा भागतील असे कार्यक्रम देण्याचा आग्रह मी धरला आहे. युद्धकालातील मुलांना माहिती मिळत राहावी, शिक्षण, आरोग्य, पुनर्वसन, करमणूक याचबरोबर त्यांना स्वतःचे मनोगत - व्यथा सांगण्याची संधी याची तरतूद होत राहिली पाहिजे. सिएरा लिओन किंवा पूर्व तिमोर येथे यासाठी रेडिओचे माध्यम प्रभावी ठरले. बाल्कन्समध्ये टी.व्ही. फार उपयुक्त ठरला.

प्रश्न : अशा त-हेच्या कामात तुमच्यापुढे आत्ता कशा प्रकारची आव्हाने आहेत?

उत्तर : मला वाटते, या प्रश्नाबाबतची सर्वसामान्य जाणीव लोकांमध्ये वाढण्याची फार मोठी गरज आहे. म्हणजे असे की, आज ही माहिती लोकांना मिळते तेव्हा त्यांना धक्काच बरतो; लोकांची मानसिकता याच्याही वरच्या स्तरावर गेली पाहिजे. त्यांनी मुलांबाबत अशी स्थिती निर्माण होणेच नाकारले पाहिजे.

आपली जाणीव व त्यावर आधारित कृती या दीर्घकाल टिकायला हव्यात. अनेक संस्था, उदाहरणार्थ, महिला मंडळे,तरूण मंडळे, शिक्षक संघटना, स्वेच्छाकार्य संस्था अशा मुलांसाठी कामे करणाऱ्यांमध्ये संघटन होऊन एक मोठा आंतरराष्ट्रीय समाजगट या कार्यासाठी सज्ज झाला पाहिजे.

युद्धे आणि लहान मुले यांच्यासंदर्भात कागदोपत्री मानके वगैरे ठरविण्याचे काम चांगलेच पुढे सरकले आहे. आता आपल्यापुढे आव्हान आहे ते प्रत्यक्ष अंमलबजावणीचे. एक-दोन गोष्टी त्यासाठी करता येतील. एक, जिथे खरोखरच माहिती व्हायला हवी तिथे, म्हणजे प्रत्यक्ष संघर्ष होतात त्या ठिकाणी, प्रत्यक्षपणे ही सर्व माहिती पोचली पाहिजे. दोन, प्रत्यक्षपणे मुलांचे संरक्षण होते की नाही हे तपासणारी यंत्रणा निर्माण व्हायला हवी. उदाहरणार्थ, मुलांना सैनिक बनवू नये तत्त्वतः मान्य झाले तरी तसे प्रत्यक्षात अंमलात येते का हे तपासून, त्याविषयीचा प्रत्यक्ष अहवाल युद्ध करणाऱ्यांपुढे आणला पाहिजे. म्हणजेच राजकीय दबाव येऊ शकेल. जी नवनवी धोरणे आपण आखतो त्याची अंमलबजावणी संबंधित घटकांनी करणे ही खरी गरज आहे आणि हेच एक मोठे आव्हान आहे.

❖